नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०५/०६/२०२५ (गुरूवार)**

---

## मा.पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी घेतली माजी सैनिक कुटुंब सुरक्षा समितीची बैठक

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत दर महीन्याच्या ५ तारखेला पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर ग्रामीण जिल्हा येथे मा. श्री हर्ष ए. पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, नागपुर यांच्या उपस्थितीत नागपुर ग्रामीण जिल्हयातील माजी सैनिकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात येते. सदर बैठकीत नागपुर ग्रामीण जिल्हयातील माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियांना असलेल्या अडचणी, तक्रारी असेल तर त्यांचे निराकरण व समाधान केले जाते.

दिनांक २०/०५/२०२५ रोजी कुही पोलीस स्टेशन अंतर्गत पाचगाव येथील शहीद सुभेदार भिमराव गायकवाड यांच्या स्मृतीदीना निमित्य कुही पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री भानुदास पिदुरकर यांनी त्यांच्या अधिकारी /अंमलदारांसह पॉचगाव येथे शहीद जवान घरी हजर राहुन शहीद सुभेदार भिमराव गायकवाड यांना नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस दलाच्या वतीने श्रध्दांजली वाहीली. संपुर्ण महाराष्ट्रात नागपुर ग्रामीण जिल्हा अशा एकमेव जिल्हा आहे की, जिथे शहीद सैनिकांच्या घरी जावुन पोलीस दलाच्या वतीने श्रध्दांजली वाहीली जाते. दिनांक ०५/०६/२०२५ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर ग्रामीण जिल्हा येथे झालेल्या माजी सैनिकांच्या बैठकीमध्ये शहीद सुभेदार भिमराव गायकवाड यांच्या स्मृतीदीना निमित्य पोलीस दलाच्या वतीने श्रध्दांजली वाहील्याबाबत सर्व माजी सैनिकांनी मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांचे आभार व्यक्त केले.


महाराष्ट्र पोलीस



## संपुर्ण महाराष्ट्रातील ग्रामीण घटकातुन नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस दलाचा माहे एप्रील आणि मे २०२५ या दोन्ही महीन्यात डायल ११२ प्रकल्पामध्ये पाचवा क्रमांक

नागपुर ग्रामीण जिल्हया अंतर्गत महाराष्ट्र आपातकालीन प्रतिसाद प्रणाली डायल ११२ प्रकल्पामध्ये नागपूर ग्रमीण घटकाने माहे एप्रील २०२५ मध्ये २०८७ कॉलचा निपटरा केला असुन सरासरी प्रतिसाद वेळ ००.०४.५१ मिनीट असा आहे. आणि माहे मे २०२५ मध्ये २१२६ कॉलचा निपटरा केला असुन सरासरी प्रतिसाद वेळ ००.०४.३५ मिनीट असा आहे. यामुळे नागरीकास आपातकालीन परिस्थितीत कमी वेळेत प्रत्यक्ष मदत मिळाली आहे. **पी सी सी राज्य पोलीस मुख्यालयाच्या अहवाल नुसार संपुर्ण महाराष्ट्रातील ग्रामिण घटकातुन कमी प्रतिसाद वेळ असल्याने नागपूर ग्रामिण जिल्हायांचा संपुर्ण महाराष्ट्रात ग्रामिण घटकातून माहे एप्रील आणि मे २०२५ या दोन्ही महीन्यात पाचवा क्रमांक आला आहे.**

## कत्तलीसाठी बांधुन ठेवलेल्या ७० गोवंश जनावरांची सुटका ,आरोपीविरूध्द गुन्हा नोंद, १ आरोपी अटक ,कन्हान पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक ०४/०६/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, आरोपी नामे मोहम्मद शफीफ कुरेशी रा. कामठी याने त्याचे शेतात नागपुर ते मन्सर रोडवरील ग्राम डुमरी शिवारामध्ये अवैधरित्या कत्तलीसाठी गोवंश जनावरे बांधुन ठेवली आहे.अशी माहीती मिळताच श्री संतोष गायकवाड ,उपविभागिय पोलीस अधिकारी ,कन्हान विभाग हे स्वत: तात्काळ कन्हान पोलीसांसह घटनास्थळी ग्राम डुमरी शिवारामध्ये मोहम्मद शफीफ कुरेशी,रा. कामठी यांचे शेतात जावुन पाहणी केली असता. सदर ठिकाणी ७० गोवंश जनावरे अत्यंत क्रुरतेने,चारापाण्याची सोय न करता तसेच त्यांच्या देखभाली साठी व्यवस्था न करता बांधुन ठेवलेले मिळुन आले. पोलीसांनी सदर जनावरांची ग्रामवासीयांच्या मदतीने सुटका करण्यात करून घेतली.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून ७० गोवंश जनावरांना ताब्यात घेवुन गोवंश जनावरांना पालन पोषणाच्या दृष्टीकोणातुन लाखणी, जि. भंडारा येथील गोशाळेत दाखल करण्यात आले आहे.**

**आरोपी मोहम्मद शफीफ अब्दुल्ला कुरेशी, ४९ वर्षे, रा. भाजीमंडी, कामठी याच्या विरूध्द कलम ११(१) (ड) प्रा. छ. अधि. सहकलम ५ (ए) ,९ महा. पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. कन्हान पोलीसांनी सदर प्रकरणी आरोपी नामे आरोपी मोहम्मद शफीफ कुरेशी रा. कामठी याला अटक केली आहे.**

## घरफोडीचे ६ गुन्हे उघड , १ लाख ६० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

पोलीस स्टेशन कोढांळी अप क्र ३०३/२५ कलम ३०३ (४) ३०५ भा.न्या.सं या घरफोडीच्या दाखल गुन्हयांचा तपास स्थानिक पोलीस करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांच्या पथकाने सुध्दा समांतर तपास सुरू केला होता. सदर तपासामध्ये दिनांक ०४/०६/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे खापरखेडा येथुन एका विधीसंघर्ष बालाकाला ताब्यात घेवुन त्याची गुन्हयासंदर्भात विचारपुस केली असता त्याने सदर गुन्हा त्याचे साथीदारासह केल्याचे सांगितल्यावर त्याचे साथीदारांपैकी दोन विधीसंघर्षग्रस्त बालकंना खापरखेडा येथुन ताब्यात घेऊन गुन्ह्याबाबत विचारपूस केली असता त्यांनी त्यांच्या अजुन २ साथीदारांसह (विधीसंघर्षग्रस्त बालकांसह) नमुद गुन्हया व्यतिरिक्त पोलीस स्टेशन काटोल, कुही, हिंगणघाट, मानकापूर ,यशोधरा नगर च्या हद्दीत घरफोडया केल्याची कबुली दिली.

**नमुद विधीसंघर्षग्रस्त बालकांच्या ताब्यातुन १) एक सोनी कंपनीची एलईडी टीव्ही किंमती. १५,०००/— रूपये,२) एक बजाज प्लसर मो.सा. क्र. एम. एच.४० ई. आर ९८१४ किंमती . ५०,०००/— रूपये, ३) ३ अँड्रॉइड मोबाईल की १५,०००/— रूपये, ४) टि.व्ही.एस. कंपनी ची रायडर बाईक क्र.एम.एच ४० सी.व्ही. ९७२४ की. ७०,०००/— रूपये, ५) रोख रक्कम १०,०००/— रूपये, ६) एक हॅवेल्स कंपनीचा टेबल फॅन की. ५,००/— रूपय असा एकूण की. १,६०,५००/— रूपये चा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**उघडकीस आलेले गुन्हे**—

१) पो.स्टे कोढांळी अप क्र ३०३/२५ कलम ३०३ (४) ३०५ भा.न्या.स.

२) पो.स्टे कुही अप क्र. ३२३/२५ कलम ३०३ (२) भा.न्या.स.

३) पो.स्टे काटोल अप क्र. ४५५/२५ कलम ३०५ (अ) ३३१ (४) भा.न्या.स.

४) पो.स्टे मानकापूर नागपूर शहर मोटर सायकल चोरी

५) पो. स्टे. हिंगणघाट घरफोडी

६) पो स्टे. यशोधरा नगर नागपूर शहर घरफोडी

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द ४ गुन्हे नोंद
## १ कोटी ३१ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त
## कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :—दिनांक ०४/०५/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैध्यरितया गौण खनिज रेती ची चोरटी वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाल्याने कन्हान पोलीसांनी महामार्ग एन. एच. ४४ वर संदेश ले आउट समोर नाकाबंदी करून खालील प्रमाणे कारवाई केली.

**कारवाई क्रमांक १ :—** नाकाबंदी दरम्यान मनसर कडुन एक टिप्पर क्रमांक ३६ ए.बी. ७५७६ हा येताना दिसला. ट्रक ला थांबवुन वाहनाची पाहणी केली असतात्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रक चालक आरोपी नामे कमलेश केशवराव गौरेकर वय ३९ वर्ष रा.गर्रा बगेडा ता. तुमसर जि.भंडारा याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता वाहनामध्ये परवान्यापेक्षा जास्त रेती असल्याचे दिसले. तसेच वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता आरोपी वाहन मालक नामे संतोष चुन्नीलाल बघेले रा. डोंगरला ता. मनसर जि.भंडारा अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष १) टिप्पर क्रमांक ३६ ए.बी. ७५७६ किमती ४०,००,०००/—रूपये व २) ६ ब्रास रेती किंमती ३०,०००/— रूपये आणि असा एकुण ४०,३०,०००/—रूपयेचा माल जप्त केला.

**कारवाई क्रमांक २ :—** नाकाबंदी दरम्यान मनसर कडुन एक टिप्पर क्र.एम.एच.४० सी.टी. १४२५ हा येताना दिसला. वाहनाला थांबवुन वाहनाची पाहणी केली असतात्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रक चालक आरोपी नामे पवन दिनदयाल चौधरी वय २८ वर्षे रा. कांटेब्रम्हणी ता. मोहाडी जि. भंडारा याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता वाहनामध्ये परवान्यापेक्षा जास्त रेती असल्याचे दिसले. तसेच वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता आरोपी वाहन मालक नामे लखन ईलमे रा. डोंगरगाव ता. मोहाडी जि. भंडारा अशी माहीती पोलीसांना प्राप्त

झाली. पोलीसांनी पंचासमक्ष १) टिप्पर क्र. एम. एच. ४० सी. टी. १४२५ किमती ४०,००,०००/— रूपये व २) ६.५ ब्रास रेती किंमती ४०,०००/— रूपये आणि असा एकुण ४०,४०,०००/— रूपयेचा माल जप्त केला.

**कारवाई क्रमांक ३ :—** नाकाबंदी मनसर कडुन टिप्पर क्र.एम.एच.३६ ए.ए. ००८२ हा येताना दिसला. वाहनाला थांबवुन वाहनाची पाहणी केली असतात्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रक चालक आरोपी नामे रमेश उमेश काळे वय २४ वर्षे रा. खापा ता.तुमसर जि.भंडारा याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता वाहनामध्ये परवान्यापेक्षा जास्त रेती असल्याचे दिसले. तसेच वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता आरोपी वाहन मालक नामे राजेंद्र देवचंद ढेंगरे रा.खापा ता.तुमसर जि.भंडारा अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष १) टिप्पर क्र.एम.एच.३६ ए.ए. ००८२ किमती २५,००,०००/—रूपये व २) ४ ब्रास रेती किंमती २०,०००/— रूपये आणि असा एकुण २५,२०,०००/—रूपयेचा माल जप्त केला.

**कारवाई क्रमांक ४ :—** नाकाबंदी मनसर कडुन टिप्पर क्र.एम.एच.३६ ए.एफ ३४४७ हा येताना दिसला. वाहनाला थांबवुन वाहनाची पाहणी केली असतात्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे ईश्वर गभने वय २४ वर्ष रा तुमसर जिल्हा भंडारा,याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता वाहनामध्ये परवान्यापेक्षा जास्त रेती असल्याचे दिसले. तसेच वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता आरोपी वाहन मालक नामे शुभम ईश्वर रहांगडाले रा खापा ता तुमसर जिल्हा भंडारा अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष १) टिप्पर क्र.एम.एच.३६ ए.एफ ३४४७ किमती २५,००,०००/—रूपये व २) ४ ब्रास रेती किंमती २०,०००/— रूपये आणि असा एकुण २५,२०,०००/— रूपयेचा माल जप्त केला.

**सदर कारवाईत एकुण ४ वाहनांसह २०.५ ब्रास रेती किंमती १,३१,१०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

नमुद आरोपी वाहन चालक आणि मालक यांच्या विरूध्द कन्हान येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून नमुद चालक ४ आरोपींना पोलीसांना अटक केली.

# अंमलीपदर्थाची विक्री करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद,आरोपी अटक स्थानिक गुन्हे शाखा,नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

दिनांक ०४/०६/२०२५ स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण चे पथक पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्‌दीत अवैध धंदयावर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, अभिनेष वर्मा रा. येरला हा येरला गावाजवळील उडाण पुलाजवळ त्याची सुझुकी एक्सेस मोपेड दुचाकी घेवुन उभा असुन तो अंमली पदार्थ एम.डी (मेथॅडॉन) बाळगुन त्याची विक्री करत आहे. मिळालेल्या महीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी जावुन सापळा रचुन अरोपी नामे **अभिनेश उर्फ अभिषेक देवशंकर बरमे उर्फ वर्मा , वय २७ वर्षे, रा. वार्ड क्र १, येरला ता. जि. नागपुर याला ताब्यात घेवुन त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता नमुद आरोपीचे ताब्यात अंमली पदार्थ एमडी मिळुन आला . पोलीसांनी नमुद आरोपीच्या ताब्यातुन १) ४. १७ ग्रॅम वाजनाचा अंमली पदार्थ एमडी किंमती १५,८५०/—रुपये, २) रोख रक्कम १६९० /— रूपये , ३) एक सुझुकी एक्सेस मोपेड दुचाकी क्रमांक एम.एच. ३१ जी सी १६६८ आणि ४) दोन ॲड्रॉईड मोबाईल असा एकुण १,४७,५४० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आला आहे.**

आरोपी नामे अभिनेश उर्फ अभिषेक देवशंकर बरमे उर्फ वर्मा , वय २७ वर्षे, रा. वार्ड क्र १, येरला ता. जि. नागपुर याच्या विरूध्द एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास कळमेश्वर पोलीस करत आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.




## चोरीचा गुन्हा उघड , ६० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

पोलीस स्टेशन अरोली अप क्र. १६८/२०२५ कलम ३०३ (२) भान्यासं या चोरीच्या दाखल गुन्हयांचा तपास स्थानिक पोलीस करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांच्या पथकाने सुध्दा समांतर तपास सुरू केला होता. सदर तपासामध्ये दिनांक ०५/०६/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे फिर्यादीला गुन्हयासंदर्भात विचारपुस केली असता फिर्यादी नामे **रामखिलावण डगसिंग सावन वय ३९वर्ष रा. इंदोरा, अरोली ता. मौदा जिल्हा नागपूर. यांनीच स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी खोटी तक्रार केल्याचे कबूल केले.** पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीकडुन त्यांच्याकडुन असल्याचे स फिर्यादी –आरोपी याचे कडून गुन्हयातील १) ओसवाल कंपनीची ५ एच पी. सोलर मोटर पंप ४०,०००/–रूपये २)पिव्हीसी पाईप २०० फूट किंमती ६,०००/–रूपये ३) इलेक्ट्रिक

केबल किंमती १२,०००/—रूपये ४) नायलॉन दोर २०० फूट किंमती २०००/— रूपये असा एकूण ६०,०००/— रूपये चा मुद्देमाल जप्त केला आहे.

**उघडकीस आलेले गुन्हे—**

१) पो.स्टे अरोली अप क्र १६८/२५ कलम ३०३ (२) भा.न्या.स.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने